REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १५ मार्च, १९४४ अंक ११

महाराष्ट्राची पहिली शेड्यूल्ड बँक

## न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

( हेड ऑफिस : मुंबई )

अधिकृत भांडवल : ३०,००,००० रु.
रोख जमा झालेलें भांडवल : ६,००,००० रु.

एकूण खेळतें भांडवल : ९७,००,००० रु.

—: शाखा :—

सोलापूर, नाशिक, नाशिक रोड, देवळाली, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, मिरज, महाड, लोणंद, अहमदनगर, पुणें, धुळें, जळगांव, दिल्ली, अमरावती, मालेगांव, सिन्नर, संगमनेर.

D. N. Gandekar, B. A., LL. B. पुणें ब्रँच मॅनेजर

D. D. Deshpande, B. A, मॅनेजिंग डायरेक्टर

प्रगतिपथावरील नवा

## मैलाचा — दगड

सन १९४३ अखेर

| | |
|---|---|
| नव्या कामांत | ११० टक्के वाढ |
| चालू कामांत | १०७ टक्के वाढ |
| आयुर्विमानिधींत | ८० टक्के वाढ |

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

## दि औंध म्यूच्युअल लाइफ अॅश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी मॅनेजिंग डायरेक्टर.

## ➢। दत्त कंपनी ।⮜

७२५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसचौकीजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.

## पुना गेस्ट हाउस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

गिरगांव मुंबई नं. ४

बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

### सैनिकांच्या करमणुकीवरील हिंदुस्थान सरकारचा खर्च

| | १९४२-४३ | १९४३-४४ |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| हिंदी सैनिक | १,१४,००० | ६०,००० |
| ब्रिटिश सैनिक | ३,६०,००० | १,७५,००० |

### बुद्धाच्या चित्रपटास विरोध

एक हिंदी फिल्म कंपनी गौतम बुद्धाच्या चरित्रावर बोलपट तयार करीत आहे, त्यास बंदी करण्याची हिंदुस्थान सरकारमार्फत व्यवस्था करण्यांत यावी, अशा अर्थाचा ठराव सिलोनच्या विधिमंडळानें मंजूर केला आहे.

### अमेरिकेंतून शेतीच्या यंत्रसामुग्रीची आयात

ऑक्टोबर, १९४३ अखेर सुमारें ४० लक्ष रुपयांची, शेतीविषयक यंत्रसामुग्री अमेरिकेंतून खंड-उसनवार पद्धतीनें हिंदुस्थानांत आणविली आहे, ती मुख्यतः हिंदी लष्करी डेअऱ्यांस पुरविण्यांत आलेली आहे.

### हिंदी कोळशाची निर्गत

जानेवारी व फेब्रुवारी, १९४४ मध्यें मिळून सिलोनकडे ६० हजार टन हिंदी दगडी कोळसा पाठविण्यांत आला. कोळशाच्या रेशनिंगची योजना यशस्वी झाली, तर हिंदी मागणी पुरी पाडल्यावर उरणारा कांहीं कोळसा मध्य-पूर्वेकडे पाठविण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे.

### सोन्याची किरकोळ विक्री

सरकारच्या मुंबई येथील टाकसाळीच्या शिक्क्याचे पांच तोळे व एक तोळा वजनाच्या सोन्याच्या चिपा रिझर्व्ह बँकेच्या कलकत्ता, कानपूर, दिल्ली, कराची, लाहोर व मद्रास येथील कचेऱ्या व इंपीरिअल बँकेच्या आग्रा, अमृतसर, बनारस, लखनौ, लायलपूर, मुलतान व पाटणा येथील शाखा येथें विकत मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

### अरबी समुद्रांत अमेरिकन आगबोट बुडाली

अमेरिकेची एक मालवाहू आगबोट अरबी समुद्रांत जपानी पाणबुडीनें जानेवारीमध्यें बुडविली, अशी माहिती अमेरिकन सरकारनें प्रसिद्ध केली आहे.

### आणखी औषधांच्या किंमती नियंत्रित होणार

हिंदुस्थान सरकारनें सध्या १,४०० औषधांच्या किंमती नियंत्रित केल्या आहेत. ही यादी वाढविण्याचा सरकारचा विचार आहे, म्हणून यादींत आणखी कोणतीं औषधें समाविष्ट करावींत, ह्यासंबंधांत लोकांनीं सूचना कराव्यात, असें सरकारनें जाहीर केलें आहे.

### टपाल लवकर येऊं लागलें

ग्रेट ब्रिटनमधून हिंदुस्थानांत समुद्रमार्गानें टपाल येण्यास पूर्वी ७५ दिवस लागत असत; आतां ५२ दिवसांत तें येऊं लागलें आहे. विमानमार्गानें टपालास पूर्वीच्या २२ दिवसांऐवजीं फक्त १०½ दिवस पुरतात.

### ब्रिटिश मालमत्ता व उत्पन्न ह्यांची वाटणी

ग्रेट ब्रिटनमधील ८०% खासगी मालमत्ता फक्त ७% लोकांच्या मालकीची आहे, व त्यांस एकूण उत्पन्नाच्या २८% इतकें उत्पन्न दरसाल मिळतें.


## नोटीस

### दी औंध स्टेट बँकिंग अँड इन्शुअरन्स कं. लि., औंध

नोटीस देण्यांत येते कीं, दी औंध स्टेट बँकिंग अँड इन्शुअरन्स कंपनी लि. च्या भागीदारांची विशेष साधारण सभा शनिवार ता. ८ एप्रिल, १९४४ इ. रोजीं दुपारीं ४-३० वाजतां (स्टँ. टा.) अगर त्या दिवशीं बोलाविलेल्या साधारण सभेचें काम संपल्याबरोबर लगेच औंध येथें श्रीयमाई देवीचे मंडपांत, भागीदारांचेकडे अगाऊ तपशीलवार पाठविलेल्या, विशेष ठरावाचा विचार करणेस व योग्य वाटलेस तो मंजूर करणेसाठीं भरणार आहे.

अशीही नोटीस देण्यांत येते कीं, वरील ठराव मंजूर झालेस तो कायम करणेकरितां कंपनीच्या भागीदारांची दुसरी विशेष साधारण सभा रविवार ता. २३ एप्रिल, १९४४ रोजीं दुपारीं ४-३० वाजतां (स्टँ. टा.) औंध येथें श्रीयमाई देवीचे मंडपांत भरेल, व सदर सभेंत पहिल्या सभेंत मंजूर झालेला विशेष ठराव कायम करण्यांत येईल.

बोर्डाचे हुकुमावरून,

औंध. ता. १ मार्च १९४४

बी. आर. वर्तक
जनरल मॅनेजर

## नोटीस.

### दी औंध स्टेट बँकिंग अँड इन्शुअरन्स कं. लि., औंध.

नोटीस देण्यांत येते कीः—

कंपनीच्या भागीदारांची सहावी साधारण सभा शनिवार तारीख ८ एप्रिल, १९४४ रोजीं दुपारीं ४ वाजतां (स्टँ. टा.) औंध येथें श्रीयमाई देवीचे मंडपांत खालील कामांकरितां भरणार आहे.

१ ३१ डिसेंबर १९४३ अखेर संपलेल्या सालाबद्दलचा डायरेक्टरांचा अहवाल, ताळेबंद, नफातोटापत्रक व ऑडिटर यांचा रिपोर्ट स्वीकारून मंजूर करणें.

*२ डिव्हिडंड जाहीर करणें.

३ व्यक्तिशः भागीदारांतर्फे दोन डायरेक्टर व सहकारी सोसायट्यांतर्फे एक डायरेक्टर यांची निवडणूक करणें.

४ नवीन सालाकरितां ऑडिटर यांची नेमणूक करणें व त्यांचें वेतन ठरविणें.

बोर्डाचे हुकुमावरून

औंध, ता. १ मार्च, १९४४

बा. रा. वर्तक,
जनरल मॅनेजर.

वि. सू.:—कंपनीचीं ट्रॅन्स्फर बुकें ता. ८-४-४४ ते २३-४-४४ अखेर दोन्ही दिवस धरून बंद राहतील.

*डिव्हिडंड मंजूर झाल्यानंतर तें सोमवार ता. २४ एप्रिल १९४४ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वारंट्स् भागीदारांच्या नोंदलेल्या पत्यावर टपालानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास कंपनीकडे सत्वर कळवावें.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ... ८२ | अमेरिकन सोन्याची विक्री—अमेरिकेचा युद्धोत्तर परराष्ट्रीय व्यापार | |
| २ असेंब्लींत फडनवीसांचें टीकाकारांस उत्तर | ... ८३ | ६ यु. किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशन | ... ८६ |
| ३ आयुर्विमा कंपन्यांवरील कर | ... ८४ | ७ विहिरींस उत्तेजन | ... ८६ |
| ४ नाणेबंदांतील रिझर्व्ह व तरतुदी | ... ८४ | ८ शेअर बाजार | ... ८६ |
| ५ स्फुटविचार | ... ८५ | ९ सरकारचा युद्धकालीन खर्च | ... ८७ |
| प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डांची सभा—ब्रिटिश व | | | |


# अर्थ

बुधवार, ता. १५ मार्च, १९४४

## असेंब्लींत फडनवीसांचें टीकाकारांस उत्तर

नेहमीच्या प्रघातास अनुसरून मध्यवर्ती असेंब्लींत सर जेरेमी रेस्मन ह्यांच्या अंदाजपत्रकावर सभासदांचीं सर्वसाधारण स्वरूपाचीं टीकात्मक भाषणें झालीं. कौन्सिल ऑफ स्टेटमध्येंहि असेंच मत-प्रदर्शन झालें. बहुतेक वक्त्यांनीं एकाना दुसऱ्या मुद्यावर अंदाजपत्रकाविषयीं नापसंती दर्शवली. लष्करी खर्चांत व तुटींत वाढ आणि जादा कर, विशेषतः चहा, सुपारी व तंबाखू ह्यांसारख्या पदार्थांवरील योजिलेली पट्टी, ह्या बाबी तीव्र टीकेचा विषय झाल्या. कित्येक सभासदांचीं भाषणें विशेष कडक झालीं. हिंदुस्थानास करावा लागणारा लष्करी खर्च देशाच्या ऐपतीच्या मानानें भारी आहे आणि चलनविस्तारामुळें झालेली महागाई जाचक आहे असें कित्येकांनीं बोलून दाखवलें आणि गरीब वर्गाच्या जरूरीच्या जिनसांच्या जबर किंमती व त्यांवरील कर ह्यांचे संबंधानें खरमरित टीका केली. अंदाजपत्रकांतील खर्च व उत्पन्न हीं सबंद सरकारच्या राज्यकारभारविषयक धोरणावर अवलंबून असतात परंतु त्यांचें समर्थन करण्याची जबाबदारी फडनवीसावर येऊन पडते. मध्यवर्ती असेंब्लीच्या लोकनियुक्त हिंदी सभासदांची टीका त्यांस किती बोचक वाटली ह्याची कल्पना सर जरेमी ह्यांनीं बजेटाच्या सर्वसाधारण चर्चेस दिलेल्या उत्तरावरून येते.

युद्धामुळें उपस्थित झालेल्या स्वाभाविक पण बिकट परिस्थितींतून, तिची झळ न लागतां, लोकांस सुरक्षित व सुखी बाहेर काढण्याची जबाबदारी फडनवीसांवर टाकणाऱ्या सभासदांच्या मनोवृत्तीविषयीं त्यांनीं तक्रार केली. युद्धाची आपत्ती देशावर येऊन पडली असतां सरकारचा खर्च वाढणें अपरिहार्य झालें, यांत फडनवीसांचा दोष काय? असें त्यांनीं विचारलें. हिंदुस्थानांत कार्यक्षम विमानदल नसल्याची कांहीं काळामागें ओरड करणाऱ्या सभासदांनीं आतां अशा दलावर खर्च करतां म्हणून फडनवीसांस विचारावें ह्याबद्दल त्यांनीं आश्चर्य प्रकट केलें. जपानच्या चढाईपासून देशाचें रक्षण करण्यासाठीं विमानगृहें उभीं करणें अत्यावश्यक होतें आणि त्यांवरचा खर्च अपरिहार्य होता. अशा स्थितींत कांहीं सभासदांनीं ह्या खर्चास विरोध करावा हें विपरीत आहे असें सर जरेमी म्हणाले. हिंदुस्थानच्या सरहद्दींपलीकडे होणाऱ्या लष्करी खर्चाचा बोजा हिंदी सरकारावर पडत नाहीं आणि ब्रह्मदेशांत लढणाऱ्या सर्व सैन्याचा खर्च ब्रिटिश सरकार सोशीत आहे अशी माहिती त्यांनीं दिली. अमेरिकन सैन्याचा खर्च अमेरिकन सरकारावर पडतो असेंहि त्यांनीं सांगितलें. लष्करी खर्चाचा बोजा हिंदुस्थानावर शक्यतितका कमी पडावा असा सरकारचा प्रयत्न आहे आणि असें असूनहि त्यावर केली जाणारी प्रतिकूल टीका असमर्थनीय आहे असें फडनवीसांच्या उत्तराचें सार होतें. चलनविस्तार आणि तज्जन्य महागाई ह्यांचे बाबतींत आपणांस देण्यांत येणाऱ्या दोषाविषयीं बोलतांना सर जरेमी ह्यांनीं ह्या परिस्थितीचें खापर सरकारशीं युद्धप्रयत्नांत सहकार्य न करणारांच्या डोक्यावर फोडलें. सरकार व चलन ह्यांचेवरचा लोकांचा विश्वास नाहींसा करणारांच्या कारवायांमुळें चलन व्यवहारांत खेळत राहतें आणि महागाईस त्याची मदत होते असा युक्तिवाद त्यांनीं केला. राष्ट्रीय वृत्तीचें सरकार अस्तित्वांत असतें तर असा प्रकार घडला नसता असा मुद्दा पुढें मांडणारांस त्यांनीं असें उत्तर दिलें कीं हा कोटिक्रम इतिहासदृष्ट्या पहातां खरा नाहीं. चीन देशांत राष्ट्रीय सरकार आहे, मग तेथें हिंदुस्थानापेक्षा किती तरी अधिक तीव्र स्वरूपांत महागाई आहे, ती कां? इजिप्तमध्यें तसेंच राष्ट्रीय सरकार आहे, तेथेंहि चलनविस्तार आणि महागाई आहे, ती कां? अशी पृच्छा करून फडनवीसांनीं असा ऐतिहासिक सिद्धांत मांडला कीं जनतेस जबाबदार असलेल्या मंत्रिमंडळाचा प्रस्तुत प्रश्नाशीं अर्थाअर्थीं संबंध नसून कोणत्याहि राज्यघटनेंत फाजील चलनविस्तार आणि मालाचा तुटवडा व महागाई असे प्रकार विशिष्ट आर्थिक परिस्थितींत घडणें अपरिहार्य आहे. हा ऐतिहासिक सिद्धांत पुढें मांडतांना दुसरें एक महत्त्वाचें ऐतिहासिक सत्य सर जरेमी विसरले आणि तें हें कीं लोकनियुक्त, राज्यघटनेंत फडनवीसास जनतेसंबंधानें त्यांच्यासारखी तक्रार करण्याचें कारण कधींच पडत नाहीं. आमचें धोरण पसंत नसेल तर दुसऱ्या मंत्रि-मंडळानें अधिक यशस्वी कारभार करून दाखवावा असें त्यांस आव्हानपूर्वक म्हणतां येतें. हिंदुस्थानांत फडनवीसांस व इतर मंत्र्यांस असें सांगतां येत नाहीं हें महत्त्वाचें सत्य आहे. ह्या देशांत लोकप्रिय मंत्रिमंडळ स्थापन झाल्यास युद्धप्रयत्न अधिक जोराचा व ज्यास्त कार्यक्षम होईल अशी हिंदी टीकाकारांची मागणी आहे आणि असेंब्लीमधील निरनिराळ्या पक्षांच्या व गटांच्या सभासदांच्या भाषणांत ती व्यक्त झाली तिचें रहस्य सर जरेमी ह्यांनीं दृष्टीआड केलें आहे. जनतेनें सरकारशीं युद्धप्रयत्नांत अधिक सहकार्य केल्यास चलनवृद्धीचा व महागाईचा [illegible] सुटण्यास सहाय होईल ह्यांत संशय नाहीं. परंतु अशी अनुकूल परिस्थिति सरकारनें निर्माण करावी असा तगादा देशांतील सन्मान्य पुढारी करीत आहेत त्याचा विचार किंवा उल्लेख सर जरेमी ह्यांच्या भाषणांत नाहीं हें जबाबदार मंत्रिमंडळाच्या अभावाचेंच द्योतक आहे.

इंग्लंड आणि अमेरिका ह्यांच्या वतीनें रिझर्व्ह बँक ह्या देशांत सध्याच्या चढीच्या भावानें सोनें विकत आहे. त्याबद्दल असेंब्ली व कौन्सिल ऑफ स्टेट ह्यांच्या सभासदांनीं केलेल्या टीकेस फडनवीसांनीं उत्तर दिलें तें समाधानकारक नाहीं. सोन्याच्या ह्या

विक्रीमुळें जनतेच्या हातांतील चलन रिझर्व्ह बँककडे परत आक-र्षलें जात आहे. ही गोष्ट खरी व चांगली आहे. पण ब्रिटिश व अमेरिकन सरकारांस सोन्याच्या विक्रीपासून जो फायदा होत आहे तो हिंदुस्थान सरकारनें स्वतःच्या पदरांत कां पाडून घेतला नाहीं ह्या टीकाकारांच्या प्रश्नास सर जेरेमी ह्यांच्या भाषणांत उत्तर दिलेलें दिसत नाहीं. इतर जिनसांच्या मानानें सोनें ह्या देशांत स्वस्त आहे. गेल्या तीस वर्षांत हिंदी शेतकऱ्यास आपल्या मालाच्या मोबदल्यांत तें इतक्या स्वस्ताईनें कधींच मिळालें नाहीं असें सांगून त्यांनीं वेळ मारून नेली. महागाईवर तोडगा म्हणून जरूरीच्या मालाच्या उत्पादनास ह्या देशांत सरकारनें उत्तेजन द्यावयास हवें होतें ह्या सूचनेस अनुलक्षून फडनवीस म्हणाले कीं यंत्रसामुग्री व कच्चा माल ह्यांची आयात शक्य झाल्याबरोबर असें उत्तेजन देणें आवश्यक व इष्ट आहे. जरूरीच्या मालाचा पुरवठा वाढवण्याचे सरकारी खात्याचे प्रयत्न चालू आहेत त्यांचा उल्लेख त्यांनीं ह्यासंबंधांत केला. सरकारी नोक-रांची संख्या व त्यांचे पगार ह्यांत काटकसर करण्याची आव-श्यकता फडनवीसांचे नजरेस आणण्यांत आली होती. परंतु युद्धपरिस्थितींत ह्या गोष्टी अव्यवहार्य असल्याचें त्यांनीं सांगितलें.

### आयुर्विमा कंपन्यांवरील इनकमटॅक्सचा कमाल दर

हिंदी आयुर्विमा कंपन्यांवरील इनकमटॅक्सचा बोजा कमी करण्यांत यावा, ह्यासंबंधीं दीर्घ काळ प्रयत्न चालू होता. ग्रेट ब्रिटनमधील परिस्थितीचा आदर्श हिंदुस्थान सरकारनें स्वतः पुढें ठेवावा, अशीहि त्याकडे मागणी करण्यांत येत होती. हिंदी आयुर्विमा कंपन्या १९३९-४० सालीं रुपयांत ४२ पै इनकम-टॅक्स भरीत असत; १९४०-४१ मध्यें हा कर ४५½ पै झाला; १९४१-४२ मध्यें त्यांत वाढ होऊन तो ५९ पै झाला. १९४२-४३ मध्यें ६३ पै पर्यंत तो वाढला व १९४३-४४ मध्यें तर त्यानें ७४ पै ची मजल गाठली. हिंदी आयुर्विमा कंपन्यांवरील इनकम-टॅक्सचा बोजा रुपयांत ६३ पै पेक्षा जास्त असूं नये व १९४३-४४ च्या कर आकारणीसहि हाच दर लागू करावा, असें फडनवी-सांनीं आपल्या १९४४-४५ च्या बजेटाचे वेळीं सुचविलें. सर-कारनें हिंदी आयुर्विमा कंपन्यांच्या मागणीस तत्त्वतः मान्यता दिल्याचें चिन्ह, ह्या दृष्टीनें ही सवलत स्वागतार्ह आहे. परंतु, आयुर्विमा कंपन्यांस ह्यापेक्षा जास्त सवलत मिळाली तर हवी होती.

### भाकड जनावरांची जोपासना

चांगलें दूध देऊं शकणारीं जनावरें कत्तलखान्यांत जाऊं नयेत, ह्या दृष्टीनें मुंबई सरकारनें सुमारें ३०० भाकड जनावरांच्या सोईसाठी फार्म चालविण्याकरितां १,९७,२८० रुपये मंजूर केले आहेत. ठाणें जिल्ह्यांतील पालघर तालुक्यांत त्याची स्थापना होईल. लोकांना आपलीं भाकड जनावरें फार्मवर पाठवितां येतील, त्याला मासिक खर्च ३० रुपये पडेल.

### सुप्रीम म्यूच्युअॅल अॅशुअरन्स कं. लि.

वरील विमा कंपनीस १९४३ अखेर मिळालेल्या कामाचे आकडे खालीलप्रमाणें असल्याचें जाहीर झालें आहे:—

| | रुपये |
|---|---|
| आलेले विमा अर्ज | १४,२३,३५० |
| स्वीकारलेलें काम | १२,१४,८५० |
| पुरें केलेलें काम | ११,०६,४०० |

### ताळेबंदांतील विविध रिझर्व्ह व तरतुदी

कंपन्यांच्या ताळेबंदांवरून त्यांच्या सांपत्तिक स्थितीची योग्य कल्पना यावी ह्यासाठी हिशेबाची मांडणी विवक्षित स्पष्ट रीतीनें करणें इष्ट असतें. निरनिराळ्या हिशेबाच्या बाबींमध्यें कोणत्या रकमांचा समावेश व्हावा किंवा होऊं नये हें ह्याकरितां निश्चित करावें लागतें. ह्यासंबंधांत अस्पष्टता राहिला असतां ताळेबंद पहाणारांची गैरसमजूत व भलता ग्रह होण्याची भीति असते. हिशेब तपासून ते बरोबर आहेत असा शेरा देणाऱ्या हिशेब-तपासणीदारांनीं ह्या गोष्टींत सूक्ष्म लक्ष घालणें अगत्याचें आहे. इंग्लंडमध्यें "इंस्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस" ह्या नांवाची हिशेब तपासणारांची प्रसिद्ध संस्था आहे. तिनें ताळेबंदाच्या स्वरूपांत कोणत्या सुधारणा होणें आवश्यक आहे ह्या प्रश्नांत मन घालून तिच्या कार्यकारी मंडळानें कित्येक महत्त्वाच्या शिफारसी केल्या आहेत आणि त्या इंस्टिट्यूटच्या सभासदांनीं अमलांत आणाव्या असें सुचवलें आहे. ह्या सूचना महत्त्वाच्या असल्यानें त्यांचेकडे येथें लक्ष वेधावयाचें आहे. ताळेबंदांत निर-निराळ्या जातींचे रिझर्व्ह, गंगाजळ्या व पुढें येणाऱ्या खर्चांच्या बाबींच्या तजविजी असतात. त्यांचें स्पष्ट वर्गीकरण व स्पष्टीकरण केलें जावें म्हणजे ताळेबंदाच्या समजुतींत घोटाळा उडणार नाहीं— अशी एक सूचना आहे. कांहीं गंगाजळ्या "मोकळ्या" अस-तात, म्हणजे पुढें व्हावयाच्या विशिष्ट खर्चांचा बोजा त्यांचेवर मुळींच पडावयाचा नसतो. नफ्यांतून किंवा इतर वाढाव्यामधून बाजूस काढलेल्या अशाच रकमांस "रिझर्व्ह" ही संज्ञा असावी आणि पुढें संभाव्य परंतु आज अनिश्चित अशा खर्चांच्या किंवा नुकसानीच्या व्यवस्थेसाठी तयार ठेवलेल्या रकमांस रिझर्व्ह न म्हणतां तरतूद किंवा "प्रोव्हिजन" म्हणावें ही सूचना सर्वथा चिंत्य व ग्राह्य होण्यासारखी अशी आहे. विशिष्ट बाबींत गुंतव-लेल्या व सहज हातीं येण्याजोग्या बाजूस काढलेल्या पैशास "रिझर्व्ह फंड" म्हणावें अशीहि एक सूचना आहे. असे अनेक फंड असूं नयेत आणि नफा म्हणून वाटतां न येण्यासारखे रिझर्व्ह स्वतंत्र व स्पष्ट दाखवले जावे असेंहि सुचवण्यांत आलें आहे. सर्व रिझर्व्ह व तरतुदी ताळेबंदांत दाखवल्या जाण्याच्या नियमास एक अपवाद सांगितलेला आहे आणि तो म्हणजे अशा प्रकारची एखादी रकम स्वतंत्र व स्पष्ट रीतीनें दाखल करणें कंपनीच्या हितास बाधक होण्यासारखें असेल तरची आहे. अशाहि प्रसंगीं ही रकम दुसऱ्या एखाद्या बाबींत अंतर्भूत केली जावी आणि तसें केलें असल्याची नोंद असावी. ह्या वरील सर्व सूचना वर म्हटल्या-प्रमाणें हिशेबाच्या चोखपणाच्या व स्पष्टपणाच्या दृष्टींनीं विचारार्ह असून शक्य तितक्या त्या अमलांत आणणें इष्ट आहे.


पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. च्या

## सभासदांस विनंति

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची सहामाही वर्षांतमक साधा-रण सभा रविवार तां. १९ मार्च १९४४ रोजीं दुपारीं ५-३० वा. बँकेच्या मुख्य दिवाणखान्यांत (बुधवार पेठ, लक्ष्मी रोड, पुणें शहर) भरणार आहे. तरी सभेस बँकेच्या सर्व सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंति आहे.

बोर्डाच्या हुकुमावरून
द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

पुणें
ता. ६-३-४४

# स्फुट विचार

## प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डाची सभा

मुंबई प्रांताच्या रूरल डेव्हलपमेंट बोर्डाची सहामाही सभा गल्या आठवड्यांत मुंबई येथें भरली होती. धान्य पुरवठ्याचे बाबतींत प्रांतिक सरकारनें नवी योजना निश्चित केली आहे तिची सभेमध्यें चर्चा झाली. विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक धान्य पिकवणारांकडून त्यांच्या जमिनीच्या साऱ्याच्या वाढत्या प्रमाणांत सरकार धान्य ठराविक किंमतीस विकत घेईल आणि त्याचा बाजारभाव स्थिर राखले जाऊन त्याची योग्य वांटणी सर्वत्र व्हावी ह्या बेतानें उपयोग केला जाईल. आतांपर्यंत सरकारी धान्य खरेदी सक्तीची नव्हती. ह्यामुळें अपेक्षेइतकें धान्य जमा झालें नाहीं आणि त्याचा पुरवठा समाधानकारक रीतीनें होऊं शकला नाहीं. ह्या अनुभवावरून निघणारा बोध घेऊन सरकारनें नवीन योजना आखली आहे. मुंबई प्रांत धान्याचे बाबतींत तुटीचा असल्यानें धान्याचें उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न शेतीखात्यानें चालवला आहे. शेतकऱ्यांस चांगलें बीं व खत पुरवण्यांत येईल आणि त्याकामीं येणारें सुमारें अर्धा कोटि रुपयांचें नुकसानहि तें सोशील. ह्या रीतीनें धान्याचें प्रांतिक उत्पादन बरेंच वाढेल अशी आशा आहे. जमिनींत बांध घालून तिची उत्पादकता वाढवण्यासाठी सरकारनें कित्येक योजना अमलांत आणल्या आहेत, त्यांस बोर्डानें मान्यता दिली. जमीनदारांच्या कुळांच्या संरक्षणासाठी प्रांतिक कायदेमंडळानें मागेंच एक कायदा केला आहे. तो रत्नागिरी व कुलाबा त्या जिल्ह्यांस लागू नव्हता, तो अपवाद आतां दूर करण्यांत आला आहे. कालव्याच्या पाण्यानें भिजणाऱ्या जमिनींत पिकांचें उत्पन्न वाढावें त्या हेतूनें सरकारनें योजना तयार केली आहे आणि तिच्या बाबत कायदाहि तयार केला आहे. पाण्याचा अधिकांत अधिक चांगला उपयोग करण्याची जबाबदारी ह्या योजनेनें जमीन मालकांवर टाकण्यांत आली आहे. शेतकरी कर्ज निवारण कायदा सध्यां प्रयोगादाखल प्रांताच्या कांहीं भागांत अमलांत आणलेला आहे. ह्या अंमलबजावणीच्या अनुभवाचा विचार करून त्यांत सुधारणा सुचवण्यासाठीं सरकारनें एक छोटी समिती नेमली होती. तिच्या शिफारशींस अनुसरून मूळच्या कायद्यांत कांहीं दुरुस्त्या करण्याचें सरकारनें योजलें आहे. त्यांची चर्चा रूरल डेव्हलपमेंट बोर्डाच्या सभेंत झाली. कापसाच्या कापडाच्या किंमतींचें नियंत्रण कसें अमलांत आलें आहे ह्याची माहिती श्री. वेलोडी ह्यांनीं बोर्डास दिली आणि हिंदुस्थान सरकारची नफेबाजी व साठेबाजी ह्यांचे विरुद्ध मोहीम चालली आहे तिचा तपशील श्री. देसाई ह्यांनीं समजून सांगितला. डॉ. जॉन मथाय ह्यांनीं युद्धोत्तर आर्थिक संवर्धनाच्या पंधरा वर्षांच्या योजनेचें विवेचन बोर्डाच्या माहितीसाठी केलें.

---

## ब्रिटिश व अमेरिकन सोन्याची विक्री

रिझर्व्ह बँक हिंदुस्थानच्या बाजारांत सोनें विकीत असल्याच्या बातम्या अलीकडे मधून मधून प्रसिद्ध होत होत्या आणि त्यांचें लोकांस गूढ वाटत होतें. सरकारनें त्या संबंधांत अधिकृत अशी माहितीहि प्रसिद्ध न केल्यामुळें जनतेचें कुतूहल अधिकच वाढलें होतें. अंदाजपत्रकाच्या स्पष्टीकरणार्थ केलेल्या आपल्या भाषणांत सर जेरेमी रेस्मन ह्यांनीं सदरहु बाबतींत खुलासा केला आणि कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें मि. जोन्स ह्यांनीं तिच्यावर प्रकाश पाडला. ह्यासंबंधांतली वस्तुस्थिति अशी आहे कीं ग्रेट ब्रिटन आणि अमेरिका हिंदुस्थानचें देणें अंशतः फेडण्यासाठी ह्या देशास सोनें पाठवीत असून त्याची विक्री रिझर्व्ह बँकेच्या मार्फत होत आहे. ज्याप्रमाणें हिंदुस्थान इंग्लंड व अमेरिका ह्या देशांस येथील बाजारभावाप्रमाणें माल पुरवीत आहे त्याप्रमाणेंच ते देश हिंदी बाजारांतील प्रचलित किंमतीनें येथें सोनें विकीत आहेत. हिंदी किंमत लंडनच्या भावापेक्षा सत्तर टक्के अधिक आहे आणि सध्याचा येथील सोन्याचा भाव गेल्या चार वर्षांत दोनशें टक्क्यांनीं चढला आहे. इंग्लंड आणि अमेरिका ह्यांस त्यांच्या सोन्याचा किफायतशीर भाव मिळत असून अनुकूल परिस्थितींत हिंदुस्थानचें देणें देऊन टाकतां येत आहे. चढीच्या भावानें हिंदुस्थानांत सोनें विकलें गेल्यामुळें त्या मानानें व्यवहारामधून चलन रिझर्व्ह बँकेकडे परत जात आहे आणि महागाईस आळा बसवण्याच्या सरकारच्या धोरणास सहाय होत आहे ही त्यांच्या दृष्टीनें इष्टापत्ती आहे. ह्या दृष्टीनेंच हिंदुस्थान सरकारनें सोनेंविक्रीस मान्यता दिली एवढेंच नव्हे तर तिचें हार्दिक स्वागत केलें, असें मि. जोन्स ह्यांनीं स्पष्ट सांगितलें. इंग्लंडच्या ह्या देशास देणें होत असलेल्या रकमा स्टर्लिंगमध्यें लंडन येथें शिल्लक पडण्यापेक्षा त्या देशानें हिंदुस्थानांत यंत्रें, सोनें, वगैरे माल मोबदल्यांत पुरवावा अशी सूचना सरकारास हिंदी जनतेच्या वतीनें आणि चलन-विस्ताराचें नियमन होण्यासाठी करण्यांत आली होती. तीस धरूनच सध्याची सोन्याची विक्री आहे. सोन्याच्या चढलेल्या भावामुळें त्याच्या विक्रींत तें विकणाऱ्या देशांस फायदा होत आहे तो हिंदुस्थान सरकारनें स्वतःच्या म्हणजे हिंदी राष्ट्राच्या पदरांत पाडून घ्यावयास हवा होता असा टीकाकारांच्या विचारसरणीचा गोख दिसतो. लंडनच्या भावानें किंवा येथील प्रचलित किंमतीपेक्षा कमी दरानें सरकारनें सोनें घेण्याचें व तें महाग विकण्याचें योजिलें असतें तर तो व्यवहार शक्य झाला असता किंवा काय हा प्रश्न येथें विचारांत घेतला पाहिजे. किफायतशीर भाव न मिळाल्यास इंग्लंड व अमेरिका ह्यांनीं आपलें सोनें येथें कां विकावें! तें न विकतांहि त्यांचा कार्यभाग होतच आहे.

---

## अमेरिकेचा युद्धोत्तर परराष्ट्रीय व्यापार

अमेरिकेची आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील सावकारी वाढत चालली आहे, त्याच्या युद्धोत्तर परिणामांकडे तेथील लोकांचें लक्ष लागून राहिलें आहे. आतां अमेरिका स्वतःला लागणारें सर्व रबर स्वदेशांतच उत्पादन करूं लागली आहे, याचा अर्थ पूर्वीप्रमाणें ह्यापुढें अमेरिकेला बाहेरून रबर आणावें लागणार नाहीं. अमेरिकेंतून बाहेर जाणारे डॉलर त्या प्रमाणांत अमेरिकन मालाच्या खरेदीला त्यामुळें उपलब्ध होणार नाहींत हें उघड आहे. म्हणजे, अमेरिकेचा निर्गत व्यापार त्यामुळें कमी होईल. अमेरिका आजवर इतर देशांच्या आगबोटींतूनच आपला माल पाठवीत असे; अमेरिकेच्या स्वतःच्या आगबोटी तयार झाल्या म्हणजे इतर देशांना माल वहातुकीसाठीं भाडें देण्याचें कारण उरणार नाहीं व त्यामुळें अमेरिकन माल घेण्याचें त्यांचें सामर्थ्य त्या प्रमाणांत कमी होईल. युद्धसमाप्तीनंतर इतर देशांशीं व्यवहार कसा करावयाचा हा मोठा अवघड प्रश्न अमेरिकेपुढें आजपासूनच उभा आहे.

### यु. किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशनचें कार्य

युनायटेड किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशन लि. ह्या संस्थेला ब्रिटिश सरकारचें भांडवलाचें पाठबळ असून तिची व्यवस्था मात्र तज्ज्ञ व्यापाऱ्यांचे हातीं आहे. ह्या कॉर्पोरेशननें ब्रिटिश निर्गत व्यापार वाढविण्याचे कामीं मिळविलेल्या यशाचें वर्णन तिचे मॅनेजिंग डायरेक्टर, सर फ्रँक निक्सन, ह्यांनीं नुकतेंच केलें. ते म्हणाले, "कॉर्पोरेशनचे पूर्ण भाग सरकारच धारण करीत आहे व तिचें धोरण ठरविण्याचा अंतिम अधिकार सरकारासच आहे. कॉर्पोरेशनची स्थापना १९४० सालीं झाली व जगाच्या वेगवेगळ्या भागांसाठी तिच्या दुय्यम कंपन्या आहेत. बाल्कन्स व तुर्कस्थान ह्यांमधून ग्रेट ब्रिटनला जर्मनी बाहेर ढकलून देत होता. ह्या देशांचा माल खरेदी करून त्याची किंमत जर्मनी मार्क नाण्यांत देई व त्यांचा विनियोग जर्मन माल घेण्यांतच करणें शक्य होई. अशा रीतीनें जर्मनीचें तेथें वर्चस्व प्रस्थापित झालें. त्यास तोंड देण्यास ब्रिटिश व्यापारी व्यक्तिशः असमर्थ होते, म्हणून सरकारच्या पाठबळानें कॉर्पोरेशनची स्थापना करावी लागली:" अशा रीतीनें, जर्मनीस मिळत असलेला माल ग्रेट ब्रिटनलाहि मिळवितां येणें शक्य झालें. बाल्कन्समध्यें, अर्थातच, विशेष घडवून आणतां आलें नाहीं परंतु तुर्कस्तानचे हातीं क्रय साधन देऊन ब्रिटिश मालाचा प्रसार तेथें सुरू करतां आला.. "आंतरराष्ट्रीय व्यापारावरील बंधनें दूर होऊं शकलीं तर उत्तमच; नाहीं तर यु. किं. कमर्शिअल कॉर्पोरेशन सारख्या निमसरकारी संस्थेचें महत्त्व युद्धानंतरहि कायम रहाणार आहे" असें सर फ्रँक निक्सन म्हणाले.

---

### विहिरी खणण्यास व सुधारण्यास सरकारचें उत्तेजन

विहिरींच्या पाण्यावरील शेतीस शक्य तेवढें उत्तेजन देण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे व त्यासाठी पुणें, अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांस सरकारनें कांहीं सवलती जाहीर केल्या आहेत. नवीन विहीर खणणारास एकूण खर्चाच्या एक तृतीयांश अथवा २०० रुपये ह्यापेक्षा अधिक होईल ती रक्कम सरकार देईल. विहिरींच्या सुधारणेवर केलेल्या खर्चाच्या निम्मा हिस्सा अथवा १०० रुपये ह्यांतील अधिक होईल ती रक्कम सरकारकडून मिळेल. मात्र, सरकारी मदत घेणारानें नवीन खोदलेल्या विहिरींच्या पाण्यावर किमान पांच एकर धान्य व सुधारणा केलेल्या विहिरीवर तीन एकर धान्य पेरलें पाहिजे, अशी सरकारची अट आहे. ज्यांना सरकारी मदत हवी असेल, त्यांनीं ॲग्रिकल्चरल इंजिनिअर, पुणें ह्या पत्त्यावर अर्ज पाठवावेत.

---

### मुंबई शहरांतील रस्ते व झाडूवाले

मुंबई शहरांतील रस्त्यांची एकूण लांबी २६८ मैल, म्हणजे मुंबई ते सोलापूर ह्यांतील अंतराइतकी आहे. हे सर्व रस्ते दररोज झाडले जातात. कांहीं रस्ते तर दिवसांतून सहा वेळा स्वच्छ करण्यांत येतात. ह्याखेरीज, २३६ मैल लांबीचे फुटपाथ व १०४ मैलांचे बोळ हेहि स्वच्छ करावे लागतात. या सर्वांची बेरीज ६०८ मैल होते. म्हणजे, मुंबई ते आग्रा ह्या अंतराइतका रस्ता रोज झाडून होतो, असा हिशेब आहे. ह्यासाठी ३ हजार झाडूवाल्यांची योजना केलेली आहे व त्यांच्या वार्षिक पगाराची रक्कम २० लक्ष रुपये होते.

### शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम., २४ डे. जि. पुणें ४)

उंदीर चावतांना फुंकर घालतो त्यामुळें चावलेल्याला दंश समजत नाहीं व विषबाधा मात्र होते. तसेंच रेसमन साहेबांनीं हिंदी अर्थ पुरुषाचे, चालू अंदाजपत्रकांत नवे कर बसवून व जुनें वाढवत वाढवत चालू वर्षाला एकदम वाढवून चावें घेतलें आहेत. शेअर बाजाराला प्रथम रेसमन साहेबांच्या खुबीमुळें पत्रक "सारुं छे" असेंच वाटलें व खाजगींत बाजार वर गेले पण सक्तीनें ठेवाव्या लागणाऱ्या रकमांचे जादा नफ्यांतील वाढलेलें प्रमाण व त्यांचे परिणाम ध्यानांत आल्याबरोबर बाजाराला जी एकदम उतरती कळा लागली ती अजूनहि स्थिरावली आहे असें म्हणतां येत नाहीं.

या करवाढीमुळें—विशेषतः कंपन्यावरील जादा आकारणीमुळें—व सक्तीनें शंभर टक्यांपर्यंत अनामत रकमा भराव्या लागणार, त्यामुळें, नुकतेंच क्रॉनिकल पत्रांत दाखविल्याप्रमाणें ज्यांचे प्रमाणित नफे कमींत कमी आहेत, त्यांना नफा असा शिल्लक रहात नाहींच. उलट कराची व सक्तीच्या ठेवींची भरपाई करण्याला खिशांतून काढून रकमा भराव्या लागतील. जो कर भरला असतां कर भरणाराला पूर्वीपेक्षा जास्त भिकारी करून सोडतो तो कर दुष्ट होय असें आर्थिक वचन आहे. जाणूनबुजून चलनाला लगाम घालण्याच्या मिषानें रेसमन साहेबांनीं हिंदी व्यापार-उदीमाला अशा रीतीनें आवळून टाकलें आहे. यामुळें उत्पादकवर्ग व उत्पादनोत्सुक या दोघांनाही खच्ची केल्यासारखें होऊन हिंदी उत्पादनास ओहोटी निसंशय लागेल असा इषारा द्यावासा वाटतो.

यापुढें जो वर्ग शेअरच्या व्याजावर विसंबून राहतो त्याची वाट काय ? बहुतेक कंपन्यांचे प्रमाणित नफे मामुली असल्यानें त्यांतून प्राप्तीवरील कर, जादा आकार आणि घसारा टाकून, भागीदारांना द्यावयास अक्षता तरी राहतील कीं नाहीं याबद्दल शंका वाटते. याचा परिणाम शेअरच्या किंमतीवर तर झालाच आहे. आणखी बाजार पडतात का तें पाहणें आहे.

### भागीदारांना आशेचा किरण

या सर्व अंधकारांतून आशेची एक चांदणी निःसंशय दिसूं शकते. ज्याअर्थी सरकारकडे जास्त ठेवी ठेवल्या जाणार आहेत व त्या परत मिळणार आहेत त्याअर्थी प्रमाणित नफ्यांतून घसारा वेगळा असा टाकण्याचें कारण नाहीं. यामुळें प्राप्तीवरील कर जरी आणखी थोडासा जास्त द्यावा लागला तरी भागीदारांना १९४१-४३ च्या सरासरीनें व्याज देतां येण्यास हरकत येऊं नये. असा वेगळा घसारा ब्रिटिश इंडिया कॉर्पोरेशननें टाकला नाहीं व मागील वर्षाचें व्याज कायम ठेवलें आहे असें त्या कंपनीच्या काल-परवा आलेल्या ताळेबंदावरून दिसून येतें व यास अनुसरून बाकीच्या कंपन्यांनाही आपलीं व्याजें देतां येतील. निदान जितकी जास्त ठेव सरकारांत ठेवली तितक्याच प्रमाणांत व्याज कर्जरोख्याच्या स्वरूपांत टाटा स्टील कं. नें दोन वर्षांखालीं दिलें होतें तसें तरी कां होईना देता आलें पाहिजे व सर्व कंपन्यांनीं त्यांच्या भागीदारांच्या हिताच्या दृष्टीनें असें व्याज द्यावें अशी शिफारस करणें इष्ट वाटतें. कारण गुंतवणारांच्या भांडवलाची नुकसानी टाळण्याचा तो एकमेव उपाय होय. हें होऊं शकेलच शकेल म्हणून बाजार आणखी खालीं पडूं नयेत व कमी व्याजाच्या दराच्या दृढपणामुळें वर येऊन टिकावेत.

## हिंदुस्थान सरकारचा युद्धकालीन खर्च

हिंदुस्थान सरकारचा १९३९–४० ते १९४३–४४ ह्या पांच वर्षांतील खर्च १० अब्ज रुपयांचेवर झाला आहे. युद्धपूर्व खर्चाच्या तुलनेचे मानानें पांच वर्षांचा खर्च ४½ अब्ज रुपयांचे-पेक्षा अधिक झाला नसता. म्हणजे ५½ अब्ज रुपये हे युद्ध-परिस्थितीमुळेंच अधिक खर्च झाले, असा अर्थ होतो. एकटा लष्करी खर्चच घेतला, तर तो ७ अब्ज, १५ कोटि रुपये म्हणजे मामुली खर्चापेक्षा ४ अब्ज, ८४ कोटि रुपये अधिक झाल्याचें आढळून येतें. युद्धकाळांतील वाढलेल्या खर्चाची वर्गवारी खालील-प्रमाणें आहे—

| | कोटि रु. |
|---|---|
| लष्करी खर्चांत वाढ | ४८४ |
| राज्यकारभाराचे खर्चांत वाढ | १७ |
| इतर खर्चांत वाढ | ७७ |
| एकूण | ५७८ |

गेल्या पांच वर्षांतील हिंदुस्थान सरकारचा एकूण खर्च व त्यांतील लष्करी खर्चाचा वाटा, ह्याची कल्पना खालील तक्त्या-वरून येईल—

| | एकूण खर्च ( कोटि रु. ) | लष्करी खर्च ( कोटि रु. ) |
|---|---|---|
| १९३८–३९ | ८५·१५ | ४६·१८ |
| १९३९–४० | ९४·५७ | ४९·५४ |
| १९४०–४१ | ११४·१८ | ७३·६१ |
| १९४१–४२ | १४७·२६ | १०३·९३ |
| १९४२–४३ (दुरुस्त अंदाज) | ३५२·१७ | २६८·५० |
| १९४३–४४ ( अंदाज ) | २९६·५८ | २१९·८० |

१९४२–४३ चा दुरुस्त अंदाज व १९४३–४४ चा खर्चाचा अंदाज देतांना, लष्करी खर्चाची वाटणी ( १ ) भांडवली व ( २ ) बिनभांडवली खर्च अशी करण्यांत आली आहे व त्याप्रमाणें लष्करी खर्च दाखविण्यांत आला आहे. १९४२–४३ च्या लष्करी खर्चापैकी ४९·१४ कोटि रुपये भांडवली स्वरूपाचे आहेत व १९४३–४४ च्या लष्करी खर्चांत १६·८५ कोटि भांडवली खर्च अंतर्भूत आहे. वैमानिक तळ, औद्योगिक वाढीसाठीं खर्च, नवीन आगबोटींची बांधणी, तार व टेलिफोनचा भांडवली खर्च, इत्यादींचा अंतर्भाव भांडवली खर्चांत केलेला आहे, कारण त्या खर्चाचें फळ नाहींसें होणार नसून पुढेंहि मिळत रहाणार आहे.

## सैनिकांची युद्धानंतरची व्यवस्था

सध्या हिंदी लष्करांत सुमारें १७½ लक्ष सैनिक आहेत व ही संख्या दरमहा ३० हजारांनीं वाढत आहे. युद्धसमाप्तीनंतर त्यांना पुन: शेतकाम लागावें, ह्या दृष्टीनें शेतें पुरवून व उद्योगधंद्यांचें शिक्षण देऊन त्यांची सोय करण्याची हिंदुस्थान सरकारची योजना आहे. सुमारें १० कोटि रुपयांचा फंड त्यासाठीं उपलब्ध होईल, अशी अपेक्षा आहे.

## पुणें अनाथ विद्यार्थी गृह

प्रवेश मिळवूं इच्छिणाऱ्या स्पृश्य हिंदूंनीं ( वय १२ ते १५; शिक्षण मराठी ७ वी पास अगर यंदा बसणारे किंवा इंग्रजी ३,४,५ इयत्ता झालेले) ८४ चीं पोस्टाचीं तिकिटें पाठवून छापील अर्ज नमुना व नियम मागवून १० एप्रिलचे आंत अर्ज करावेत.


### जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना कधींही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढवि-लेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा–बुधवार पेठ, पुणें २.

### मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध

# मागोरा पिल्स

अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.

१६ गोळ्यांच्या डबीस रु. १

— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —

मागोरा केमिकल कं. लि.
टिळक रोड, पुणें २.

पुण्यांतील
### आदर्श निवासस्थान व भोजनालय
## छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं ( Vitamins ) युक्त असे
( सरकार खात्यानें मान्यता दिलेले )
## टोमॅटो केचप ( गोड ) व
## टोमॅटो सॉस [ तिखट व आंबट ]
आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.
### रूरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें
बिझिनेस ऑफिस : ९१३ अ सदाशिव, पुणें २.

देवघरांतील धनुकल्या पळविणाऱ्या धनुर्धारी
वंडखोर बालवीरांची वंडाळी
देवांच्या कानावर कामाळी
" देवा आतां कापूस कसा पिंजावा !
रामा आतां वाती कशा कराव्या ?"

# २० वा आँठवडा

प्रकाश पिक्चर्सचा पौराणिक मराठी बोलपट

# रामराज्य

दिग्दर्शक:—विजय भट्ट.
भूमिका: शोमना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी

**मिनर्व्हा, पुणें** रोज फक्त दोन खेळ ६। व १० वाजतां

दर शनि. रवि. सोम. व बुधवार ता. १५ रोजीं रंगपंचमी-
निमित्त खास जादा खेळ दुपारीं २॥ वाजतां .
[ एव्हरग्रीन—प्रकाशन ]

# शेवटचा
# *१३ वा आठवडा !*

रॉयल रत्न १८ वें

# महात्मा विदुर

दिग्दर्शक:—पार्श्वनाथ आळतेकर
कला:—बाबुराव पेंटर
पागनीस, दुर्गा खोटे
यांची एकत्र भूमिका असलेला भक्त—पट
नायमपल्ली, मनोहर घटवाई, प्रल्हाद

रविवारीं सकाळीं जादा खेळ १० वाजतां

दररोज तीन खेळ ३, ६॥ व १० वाजतां

## आर्यन, पुणें

# ध्यास! आणि प्यास!!



तिला त्याचा ध्यास
लागला होता !
त्याला तिच्या प्रेमाची प्यास
लागली होती !
ध्यास—प्यासाचें मधुर मीलन !

**ग्लोब—पुणें ! ६ वा आठवडा !**

एव्हरग्रीन प्रकाशन — प्रकाश पिक्चर्सकृत

# —पनघट—

भूमिका
रत्नमाला, उमाकांत, जीवन
रोज ६॥ व १० वा.
दर शनि. रवि. व बुधवार ता. १५ रोजीं
रंगपंचमीनिमित्त ३॥ वा. जादा खेळ


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाविलास, ' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.